माहिती तंत्रज्ञान घटकांना द्यावयाची प्रोत्साहने योजना अंतर्गत फिक्की फ्रेम (FICCI FRAME २०१९) -बेस्ट ॲनिमेटेड फ्रेम्स ॲवॉर्ड, मुंबई ला अनुदान वितरीत करणेस मान्यता देणेबाबत. वित्तिय वर्ष (२०१८-१९) करीता.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
शासन ज्ञापन क्रमांक : मातंधो-२०१९/प्र.क्र. ३१/उद्योग-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ मार्च, २०१९.

संदर्भ: १) शासन निर्णय क्र. आयटीपी-२०१३/ प्र. क्र. २६५/ उद्योग-२, दिनांक २५/०८/२०१५
२) शासन निर्णय क्रमांक : मातंधो-२०१५/प्र.क्र.२०७/उद्योग-२, दिनांक २२ /०२/२०१६
३) श्रीमती लिना जैसानी, असिस्टंट सेक्रेटरी जनरल, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रि (फिक्की) यांचा दि. २० डिसेंबर, २०१८ चे पत्र व सहपत्र .
४) वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र. क्र. ६९/अर्थ -३ दि. ०२/०४/२०१८ व दिनांक २५ जानेवारी, २०१९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०१५ उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २५/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये तसेच महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०१५ मध्ये सुधारणा करण्याबाबत चा शासन निर्णय दिनांक २२/०२/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५ मध्ये माहिती तंत्रज्ञान घटकांना द्यावयाची प्रोत्साहने योजना याबाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे.

परिच्छेद क्र. ५C ४) vi) इ) :- खालील वार्षिक कार्यक्रमांसाठी महाराष्ट्र हे यजमान राज्य असेल व या कार्यक्रमांना प्रायोजक म्हणून पुढील ५ वर्षाकरीता प्रत्येक कार्यक्रमासाठी प्रतिवर्ष रुपये १० लाख पर्यंतचा खर्च स्विकारेल आणि अशा कार्यक्रमांना करमणूक कर भरण्यापासून सूट देण्यात येईल.

१) फिक्की फ्रेम (FICCI FRAME) - बेस्ट ॲनिमेटेड फ्रेम्स ॲवॉर्ड, मुंबई.
२) नॅसकॉम (NASSCOM) - गेम डेव्हलपर्स कॉन्फरन्स, पुणे.
३) द ॲनिमेशन सोसायटी ऑफ इंडिया- ॲनिफेस्ट, मुंबई.
४) ASIFA - जागतिक ॲनिमेशन दिन- प्रत्येक वर्षी २८ ऑक्टोबर,
५) एमसीसीआयए- डिजिटल कन्टेंट इव्हेंट, पुणे.
६) एन आयएलएफ- नॅसकॉम इंडियाज लिडरशीप फोरम.

२. श्रीमती लिना जैसानी, असिस्टंट सेक्रेटरी जनरल, मे. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रि (फिक्की) यांनी दि. २० डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रि (फिक्की) यांचेकडून सन २०१९ मध्ये दिनांक १२ ते १४ मार्च, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या फिक्की फ्रेम (FICCI FRAME २०१९) - बेस्ट ॲनिमेटेड फ्रेम्स ॲवॉर्ड, मुंबई मध्ये राज्यशासनाने होस्ट स्टेट म्हणून रुपये १० लाखाचे

प्रायोजकत्व स्विकारुन पांठिबा देण्याची विनंती केल्याच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१५ मुद्दा क्र. ५C ४) vi) इ) येथील तरतुदीनुसार माहिती तंत्रज्ञान घटकांना द्यावयाची प्रोत्साहने योजना अंतर्गत सन २०१८-१९ साठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून या कार्यक्रमास प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होता.

शासन ज्ञापन:-

महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०१९ मधील परिच्छेद क्र. ५C ४) vi) इ) येथील तरतूद विचारात घेता फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रि (फिक्की) यांचेकडून दिनांक १२ ते १४ मार्च, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात येत असलेल्या फिक्की फ्रेम (FICCI FRAME २०१९) - बेस्ट ॲनिमेटेड फ्रेम्स ॲवॉर्ड, मुंबई या कार्यक्रमासाठी होस्ट स्टेट म्हणून प्रायोजकत्व स्विकारुन रुपये १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) पर्यंत खर्च स्वीकारण्यास व त्यानुषंगाने रुपये १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) इतकी रक्कम वितरीत करण्यास शासन या ज्ञापनाद्वारे मान्यता देत आहे.

२. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांनी रु. १०.०० लाख (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) ही रक्कम शासकीय कोषागारातून काढून फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रि (फिक्की) यांना देण्याची व्यवस्था करावी. उपरोक्त रु. १०.०० लाख (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) ही रक्कम आहरण व वितरण करावयाचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

३. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/ प्र. क्र. ६९/ अर्थ-३ दिनांक २५/०१/२०१९ च्या परिपत्रकातील सुचना तसेच सदर दिनांक २५/०१/२०१९ च्या परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार वित्त विभागाच्या समक्रमांकाच्या दि. ०२/०४/२०१८ परिपत्रकातील सूचना व त्यासोबतचे परिशिष्ट यानुसार असे प्रमाणित करण्यात येते की, महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०१५ संदर्भांत शासन निर्णय संदर्भ क्र. १ द्वारे निर्गमित करण्यात आला असून सदर धोरणातील परिच्छेद क्र. ५C ४) vi) इ) येथील तरतुदीनुसार माहिती तंत्रज्ञान घटकांना द्यावयाची प्रोत्साहने योजना या प्रयोजनार्थ अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय मुंबई यांनी फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रि (फिक्की) यांचेकडून दिनांक १२ ते १४ मार्च, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात येत असलेल्या फिक्की फ्रेम (FICCI FRAME २०१९) -बेस्ट ॲनिमेटेड फ्रेम्स ॲवॉर्ड, मुंबई या कार्यक्रमासाठी देण्यात येणारे प्रोत्साहन पर अनुदान वितरीत करण्यापूर्वी संदर्भ क्र. १ व २ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या बाबींसाठीच खर्च होत आहे तसेच शासन निर्णयातील तरतुदी, निकष, पात्रता इत्यादींची पडताळणी/शर्तीची काटेकोर अंमलबजावणी करण्याची खात्री करुन निधीच्या सुयोग्य वापरावर व विनियोगावर देखरेख ठेवण्याची आवश्यक ती कार्यवाही करावी.

५. या शासन ज्ञापनान्वये मंजूर केलेल्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) उद्योग संचालनालयाने फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रि (फिक्की) मुंबई यांचेकडून प्राप्त करुन शासनास सादर करावे.

६. या कामी होणारा खर्च, मागणी क्रमांक - के - ७, लेखाशिर्ष २८५२ - उद्योग, १०२, औद्योगिक उत्पादकता, (००)(१४) माहिती तंत्रज्ञान घटकांना द्यावयाची प्रोत्साहने (योजनेतर) (२८५२ ०५३२), ३३ - अर्थसहाय्य या लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. हे ज्ञापन वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/ प्र. क्र. ६९/ अर्थ-३, दिनांक २५/०१/२०१९ मधील सूचना तसेच दिनांक २५/०१/२०१९ च्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार वित्त विभागाच्या समक्रमांकाच्या दिनांक ०२/०४/२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. सदर योजनेबाबत कोणतेही लेखा आक्षेप नसून ही योजना वैयक्तिक लाभाची नाही. तसेच यापूर्वी सदर प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या अनुदानाबाबत विकास आयुक्त (उद्योग) यांनी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास उपलब्ध करुन दिलेली आहेत.

८. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३२९१७४००४६७१० असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Shamkant Degaonkar

Digitally signed by Sanjay Shamkant Degaonkar
DN: CN = Sanjay Shamkant Degaonkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Industry, Energy and Labour Department
Date: 2019.04.04 17:40:51 +05'30'

(संजय देगांवकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई-४०० ०३२.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. वित्त विभाग, (कार्यासन अर्थसंकल्प-१४/व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (फिक्की), फेडरेशन हाऊस, तानसेन मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
८. कक्ष अधिकारी, (प्रशासन-१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग-४०० ०३२.
९. निवड नस्ती, (उद्योग-२).